**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1193/2007.**

श्री गजानन प्रल्हादरात तेलगोटे
मु.पो.ता.सोमवार वेस, आकोट जि.अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ज्ञानेश भट
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
2) श्री बी. जी. ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.7.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी (पुनवठा अधिकारी) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

सन 1 जून 2000 ते 1 जून 2001 या कालखंडात आकोट शहरात केरोसीन किरकोळ परवाने मंजूर करण्यात आलेत यासंबंधी यामध्ये एकुण कीती अर्ज आलेत. अर्जदारांची संपूर्ण नाव, पत्ता, जन्मतारीख, जातीचा वर्ग, शिक्षण, दुकानाचे क्षेत्रफळ भागभांडवल बॅंक बचत खाते क्रमांकासह किंवा बॉण्ड गुंतवणूक, वार्षीक उत्पन्न, व्यावसाय, शेरा, शासकीय गुंतवणूक किती? एकुण कुटुंब नियोजनाचे कीती केसेस प्रती अर्जदारा देईल, अर्जदारास परवाना मंजूर/नामंजूर करण्याचे स्पष्टीकरण इत्यादी संपूर्ण माहिती पुराव्यासह पूरविण्यात यावी ही विनंती. तसेच उपरोक्त कालखंडात 1 जून 2000 ते 1 जून 2006 यामध्ये महसूली गावात किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करणे संबंधी शासनाचे निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शक तत्वे व नियमावलीचे प्रत्येक पानाची प्रत देण्यात यावी. आकोट नागरी क्षेत्रात या कालावधीत परवाने मंजूर झालेल्या परवाना धारकांचे संपूर्ण पासासह नाव व परवाना क्रमांक व क्षेत्राचे नाव व त्यांना प्रत्येकाजवळ जोडण्यात आलेले एकुण कार्डधारक व एकूण युनिट कीती व कोण्या क्षेत्रातले रहीवासी कार्डधारक इत्यादी व परवाना धारकांना उपरोक्त जून 2001 ते 31 जून 2006 पर्यंत दरमहा कीती लिटर्स घासलेट वितरीत मंजूर आहे ते तसेच त्यांनी कार्डधारकांना दरमहा, दरवर्षी, प्रतीयूनीट, प्रती कार्डधारकांना केरोसीन किती विक्री केले त्या रजिस्टरची प्रत्येक पानाची प्रत पुराव्यासह देण्यात यावी. माहितीचा कालावधी 1 जून 2000 ते 1 जून 2006 पर्यंत.

अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी प्रमाणपत्राची प्रत जोडल्याचे दिसून येत आहे व माहिती यु.पी.सी. द्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. पुन्हा दिनांक 17.1.2006 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दिनांक 11.2.2004 रोजी आपले आदेशान्वये आकोट नगरात 3 रास्त भाव दुकाने मंजूर झालीत ते दुकान क्र. 156, 157 व 158 अनुक्रमे लटफूटे, पाटील, धूळे यांनी रास्त भाव दुकानाच्या परवाना प्राप्ती करीता अर्ज केलात, त्यांचे अर्जाची व अर्जाना जोडलेल्या सर्व कागदपत्राची व परवाना आदेशाची झेरॉक्स प्रती पूरावासह देण्यात यावे ही विनंती. तसेच दि. 1.1.2002 ते 11.2.2004 पर्यंत रास्त भाव परवाना संबंधीचे सर्व शासननिर्णय,

व परिपत्रके व मार्गदर्शन नियमावलीचे सर्व परीपत्रकातील झेरॉक्स प्रती पूरावासह देण्याची कृपा करावी. माहितीचा कार्यकाळ दि. 1.1.2002 ते 11.2.2004 पर्यंत.

सदरच्या दोन्ही अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.2.2006 रोजी शासन निर्णयानुसार रु. 10 चा न्यायालयीन स्टॅम्प फी सह अर्ज करण्यात आला नसल्याने आपला वरीलप्रमाणे मुळ अर्ज आपणास परत करण्यात येत आहे. त्रुटीची पूर्तता करुन अर्ज सादर करण्यात यावे असे आपणास विनंतीसह कळविण्यात येत आहे. त्यानंतर पुन्हा दि. 27.2.2006 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितल्याचा अर्ज केलेला दिसून येतो.

1) श्री गजानन तेलगोटे यांनी दि. 7.2.2006 रोजी दिलेल्या अर्जा ''अकोट नगर परीधान क्षेत्रात केरोसीन परवाने मंजूर करणे संबंधी'' दिलेल्या अर्जासंबंधी असलेल्या दैनंदीन प्रगती व कार्यवाही संबंधी पूराव्यासह माहीती पुरविणेबाबत (2) दि. 7.2.2006 चे अर्जानूसार श्री सुनील पीनाबंखाले केरोसीन विक्रता आकोट ला.नं. 9/93 यांचे कडून सन 1993 ते सन 2006 पर्यंत यांचेकडून न उचल केलेला कोटा व शासनाकडे शिल्लक असलेला घासलेटचा कोटा अगर कार्डधारक श्री प्रल्हाद जंबुनी तेलगोटे यांना तात्काळ देणेबाबत चा दि. 7.2.2006 चा अर्जासंबंधी होत असलेली दैनंदिन प्रगती व कार्यवाही संबंधी माहीती पुराव्यासह तात्काळ देणेबाबत. (3) वि. जिल्हा पूरवठा अधिकारी अकोला यांनी आकाट शहरात दि. 11.2.04 रोजी 3 रास्त भाव दूकाने मंजूर केलीत दुकान क्र. 156, 157 व 158 या तीनही अर्जराराचे अर्जातील सर्व कागदपत्राची सत्यप्रत व मंजूरी आदेशाची प्रत तसेच रास्त भाव दुकाने मंजूर करणे संबंधीचे शासन निर्णय दि.6.3.02 व 14.3.02 या शासन निर्णयाचे परिपत्रकाची सत्यप्रत तसेच रास्त भाव दुकाने व केरोसीन परवाने मंजूर करणे संबंधीचे दि. जाने. 2000 ते जाने 2006 पर्यंतचे शासन निर्णय व परिपत्रकाचे प्रमाणीत प्रती पुराव्यासह माहीती देण्यात यावी ही विनंती. माहीतीचा कालावधी मुद्दा नं 1 व 2 करीता सन 2006 मुद्दा नं. सन 2000 ते 2006 पर्यंत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.3.2006 रोजी शासन निर्णयानुसार रु. 10 चे न्यायालयीन स्टॅम्प फी सह अर्ज करण्यात आले नसल्याने आपला मुळ अर्ज पत्रासह

परत करण्यात येत आहे. तरी पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन अर्ज सादर करण्यात यावे असे आपणास विनंतीसह कळविण्यात येत आहे. यावर दि. 20.3.2006 रोजी अपीलकर्ता यांनी उपरोक्त तारखेला मी वेगवेगळया संबंधी माहिती आपणाकडे मागविली मी दारिद्रय रेषेखालील असून अर्जासोबत कार्डाची सत्यप्रत जोडलेली होती परंतु आपणी वरील तीनही अर्ज तिकिट न लावल्यामुळे या सदराखाली परत पाठविले तरी कृपया आपण निर्धारीत वेळेत कालावधीत माहिती पुरविली नाही म्हणून आपण दंडास पात्र ठरलात तरी वरील विषयास अनुसरुन अर्जदार आपले विरुध्द अर्ज दाखल करुन दंड वसुलीची कार्यवाहीची अपील दाखल केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती असे माहिती अधिकारी यांना कळविलेले दिसून येते व प्रेषक जिल्हा पुरवठा अधिकारी अकोला यांचे कार्यालयात दि. 21.3.2006 रोजी स्विकृत केलेले दिसून येते. त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2006 रोजी प्रथम अपील जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्याकरीता विद्यमान माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तात्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी श्री बी. एच. बिबे यांना पत्र दिलेले दिसून येते व त्यावरुन मुळ अर्ज आपणाकडे माहिती व पुढील आदेशास्तव दि. 23.3.2006 रोजी टिपणीसह सादर करण्यात आला. दि. 2.5.2006 रोजी आपली बदली पुसद येथे झाली. अनवधानाने कार्यभार हस्तांतरण करतांना सदर प्रकरण संबंधित लिपीकाकडे देण्यात आलेले नाही तरी अनवधानाने सदरचे प्रकरण/नस्ती आपणाकडे राहिली असल्यास सदरचे प्रकरण/नस्ती या कार्यालयास पुरविण्यात यावे असे कळविलेले दिसून येते परंतु दिनांक 13 जुन 2006 रोजी विशेष भुसंपादन अधिकारी (एस) प्रकल्प पुसद यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांना पत्रामध्ये नमुद केलेला अर्जदार श्री गजानन प्रल्हादरात तेलगोटे रा. आकोट यांचे अर्जाची नस्ती माझ्याकडे नाही असे

कळविलेले दिसते व त्यावरुन प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला दिसून येत नाही व म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांनी दि. 21.3.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचे निदर्शनास दारिद्रय रेषेखालील अर्जाच्या संदर्भात कळविलेले दिसून येते. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णयही दिलेला नसल्यामुळे त्यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. संबंधित माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांना कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे शास्ती बद्यल त्यांचे म्हणणे एकुन घेण्याची संधी द्यावयास पाहिजे परंतु संबंधित तात्कालीन माहिती अधिकारी हे त्यांची बदली झाली असल्यामुळे आज सुनावणीच्या वेळेस विद्यमान माहिती अधिकारी हे हजर आहेत व त्यामुळे जिल्हाधिकारी अकोला यांनी सदरच्या प्रकरणामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्याच्या संदर्भात जे जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदर असतील त्यांच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शास्तीची रक्कम ही वसुल करणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे. व ही बाब त्यांच्या गोपनिय अहवालात घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वेगवेगळया तीन तालुक्यातील कार्यालयातील असल्यामुळे त्यांच्या दि. 9.1.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांचे दि. 9.1.2006 च्या अर्जाच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी अकोला यांनी जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली संबंधित जबाबदार अधिका–याच्या किंवा कर्मचा–याच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्यात येवून तशा प्रकारचा अहवाल तीन महिन्याच्या आत राज्य माहिती आयोगास सादर करावा.

3) सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.3.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.